


दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २४१ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.८ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


# ग्रामीण भागाचा विकास–रोजगार निर्मिती हाच आपल्या अर्थव्यवस्थेचा खरा पाया असावा

## गरीब वाढतायत, संपत्ती काही मोजक्यांच्याच हातात–नितीन गडकरी

नागपूर (वृत्तसंस्था)–देशात आर्थिक विकास होत असला, तरी त्याचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहचत नाही, हीच खरी चिंतेची बाब आहे, असे वक्तव्य करत केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी वाढत्या आर्थिक विषमतेकडे लक्ष वेधले आहे.नितीन गडकरी पुढे बोलताना म्हणाले की, हळूहळू गरीबांची संख्या वाढते आहे, आणि संपत्ती काही मोजक्या श्रीमंतांच्या हाती केंद्रित होते आहे. अशी स्थिती देशासाठी आरोग्यकारक नाही. संपत्तीचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. ग्रामीण भागाचा विकास आणि रोजगार निर्मिती हाच आपल्या अर्थव्यवस्थेचा खरा पाया असायला हवा, असेही त्यांनी नागपूर येथील एका कार्यक्रमात बोलताना म्हटले आहे.

### रस्ते विकासासाठी निधी कमी नाही

रस्ते बांधकाम संदर्भात केंद्रीय मंत्री गडकरी यांनी स्पष्ट केले की, माझ्या विभागाकडे निधीची कमतरता नाही. उलट प्रकल्प पूर्ण करणाऱ्या सक्षम लोकांची गरज आहे. सध्या टोलमधून ५५ हजार कोटींचे उत्पन्न असून, पुढील दोन वर्षांत हे उत्पन्न १.४० लाख कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. हे उत्पन्न चलनीकरण केल्यास १२ लाख कोटींच्या गुंतवणुकीची क्षमता निर्माण होते, अशी माहितीही त्यांनी दिली.



### संपत्तीचे विकेंद्रीकरण करणे गरजेचे

नितीन गडकरी म्हणाले की, आपण एकाच ठिकाणी संपत्तीचा संचय करतो, आणि त्याचा सर्वसामान्यांवर परिणाम होतो. हे रोखणे गरजेचे आहे. तर माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव आणि माजी अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक उदारीकरण धोरणांचे त्यांनी कौतुक केले, पण अनियंत्रित आर्थिक केंद्रीकरणावर त्यांनी थेट टीका केली.

### शेतीची दुर्दशा अधोरेखित

भारताच्या जीडीपीमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा ५२–५४ टक्के, उत्पादन क्षेत्राचा २२–२४ टक्के, तर ६५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असूनही, तिचे योगदान केवळ १२ टक्क्यांवरच मर्यादित आहे, याकडे गडकरींनी लक्ष वेधले. ही असमानता दूर करणे आपल्या धोरणांचे केंद्रबिंदू असायला हवे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

### सीएंना नवा दृष्टिकोन

चार्टर्ड अकाउंटंट्सच्या भूमिकेबाबतही नितीन गडकरी म्हणाले की, सीए हे केवळ कर सल्लागार नसून, अर्थ व्यवस्थेच्या वाढीचे इंजिन ठरू शकतात. त्यांचा वापरकेवळ आयकर आणि जीएसटीपुरता मर्यादित असता कामा नये.



## बेहेडमध्ये अवैध दारू विक्रीविरोधात संयुक्त कारवाई!

# दैनिक सह्याद्रीचा राखणदार च्या बातमीची तत्काळ दखल; गावकऱ्यांनी मानले आभार

साक्री (प्रतिनिधी)–साक्री तालुक्यातील बेहेड गावात अवैध गावठी दारू विक्रीविरोधात दोन दिवसांपूर्वी दैनिक सह्याद्रीचा राखणदार या दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातमीची प्रशासनाने तातडीने दखल घेतली असून, पोलिसांनी केलेल्या कारवाईमुळे गावकऱ्यांमध्ये समाधान आणि प्रशासनाबद्दल विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.गावात काही ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू असल्याची माहिती वारंवार समोर येत होती. याबाबत नागरिकांमध्ये अस्वस्थता होतीच, पण स्थानिक वृत्तपत्राने या समस्येला वाचा फोडताच, साक्री पोलीस तत्काळ क्शन मोडमध्ये आले. विशेष म्हणजे गावकऱ्यांनीही आपली सामाजिक जबाबदारी पार पाडत पोलिसांना विश्वासात घेतले आणि त्यांना आवश्यक ती माहिती पुरवली.



दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
sahyandri rakhandar 2 July 20252 copy
02 Jul 2025

दारूवाल्यांनो सावधान..बेहेड आता पेटलंय!

**अवैध दारूविक्रीविरोधात संतप्त जन आंदोलनाचा इशारा;पोलिसांना निवेदन**

बाहेरच्यांनी केली गावाची बदनामी–गावकऱ्यांचा थेट इशारा

धुळे । उमाकांत अहिरराव

साक्री तालुक्यातील बेहेड गावामध्ये सध्या अवैध दारूविक्रीच्या विरोधात संतप्त जनतेचा रोष उफाळून आला असून, गावकऱ्यांनी थेट पोलीस ठाण्याचे दरवाजे ठोठावत आपली व्यथा मांडली आहे. गावात बाहेरगावाहून येणाऱ्या दारूप्रेमींचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत चालला असून, त्यामुळे कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. महिलांना शिवीगाळ, तोंडी छळ, आरडाओरड व अश्लील वर्तन सहन करावं लागत असून, सार्वजनिक ठिकाणी घडणाऱ्या या प्रकारांमुळे गावाची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळत आहे. इतकंच नव्हे तर, या वातावरणाचा परिणाम गावातील तरुणांच्या वैवाहिक आयुष्यावर होत असल्याचेही नागरिकांनी स्पष्ट केले.या पार्श्वभूमीवर बेहेड गावातील तरुण, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येत साक्री पोलीस ठाण्याचे निरीक्षक दीपक वळवी यांना निवेदन सादर केले. गावातील बसस्थानक परिसर, मुख्य रस्ते व सार्वजनिक जागा येथे मद्यधुंद अवस्थेत वावरणाऱ्या लोकांकडून निर्माण होणाऱ्या त्रासामुळे ग्रामस्थांमध्ये अस्वस्थता आहे. अवैध दारू, सट्टा, मटका, ताडी यांचे जाळे गावात खुलेआम पसरले असून, यामुळे तरुण पिढी वाईट सवयींच्या आहारी जात असल्याची चिंतेची बाब ग्रामस्थांनी मांडली.पोलीस निरीक्षक वळवी यांनी ग्रामस्थांचे म्हणणे गांभीर्याने ऐकून घेतले असून, अशा अवैध विक्रेत्यांवर लवकरच कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. मात्र, केवळ पोलिसांची कारवाई पुरेशी नाही, ग्रामस्थांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असा स्पष्ट संदेशही त्यांनी दिला. विशेष म्हणजे, या निवेदनप्रसंगी गावाचे पोलीस पाटील देखील तरुणांसह उपस्थित होते, हे या चळवळीला संस्थात्मक आधार मिळाल्याचे लक्षण मानले जात आहे.
बेहेड गावात सुरू असलेल्या अवैध दारूविक्रीचा प्रश्न केवळ कायदा–सुव्यवस्थेपुरता मर्यादित राहिलेला नसून, आता तो गावाच्या सामाजिक प्रतिष्ठेशी निगडित झाला आहे. त्यामुळे जर लवकरच ठोस उपाययोजना करण्यात आल्या नाहीत, तर गावकऱ्यांचा रोष संतप्त जनआंदोलनात रूपांतरित होईल, हे निश्चित असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या संयुक्त कारवाईत रात्री उशिरा दोन संशयित गावठी दारू विक्रेत्यांना मुद्देमालासह अटक करण्यात पोलिसांना यश आले. जप्त केलेल्या दारूचा साठा आणि वापरण्यात आलेल्या साहित्याने हे स्पष्ट झाले की, ही विक्री संगनमताने आणि पुन्हा पुन्हा सुरू ठेवण्याच्या उद्देशाने होत होती. मात्र यावेळी ग्रामस्थ आणि पोलिसांनी मिळून हा प्रयत्न हाणून पाडला.ही कारवाई होताच परिसरात खळबळ उडाली असून, इतर अवैध दारू विक्रेत्यांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण



झालं आहे. गावकऱ्यांनी वृत्तपत्राचे आणि पोलिसांचे आभार मानले असून, सामाजिक प्रश्नावर वृत्तपत्रांची तत्काळ आणि निर्भीड भूमिका किती प्रभावी ठरू शकते, याचे हे उत्तम उदाहरण आहे असे मत अनेकांनी व्यक्त केले.दैनिक सह्याद्रीचा राखणदार मध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीने समाजमन हलवले आणि प्रशासनाला जागे केले हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. ही फक्त बातमी नव्हे, तर गावाच्या संरक्षणासाठी घेतलेले एक ठोस पाऊल ठरले आहे. अशा प्रकारच्या समाजहिताच्या कृतीमुळे गावकऱ्यांमध्ये सजगता निर्माण होत असून, पुढील काळात अशा अवैध कृत्यांना पायबंद घालण्यात हीच एकजूट उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# प्रेमविवाहाचा सूड; दुकानात घुसून तरुणावर कोयत्याने हल्ला

## टाकळीहाजीतील धक्कादायक घटना

**शिरूर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील टाकळीहाजी गावात भरदिवसा घडलेली हिंसक घटना सध्या प्रचंड चर्चेत आहे. प्रेमविवाह केल्याच्या कारणावरून एका तरुणावर कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात भीतीचं आणि अस्वस्थतेचं वातावरण पसरलं असून, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या बेधडक वर्तनावर नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.



दत्तात्रय हौशीराम वाघ (वय २२) हे टाकळीहाजी गावात कुंडाई मेन्स पार्लर चालवत होते. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी जीवन रविंद्र गायकवाड या मुलीशी प्रेमविवाह केला होता. या वैयक्तिक निर्णयाचा राग मनात ठेवून काही तरुणांनी त्यांच्या दुकानात घुसून कोयत्याने दत्तात्रय यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. हल्ल्यामुळे त्यांच्या डाव्या हातावर, पाठीवर आणि मनगटावर गंभीर जखमा झाल्या. शिवाय, तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देण्यात आल्याने घटनेचं गांभीर्य अधिक वाढलं.हल्ल्यानंतर गावात तणावाचं वातावरण पसरलं. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना तत्काळ माहिती दिली. शिरूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला. आरोपींची ओळख जीवन रविंद्र गायकवाड (रा. कानगाव, ता. दौंड), शाहरूख बाबू शेख (वय २६, रा. पाटस, ता. दौंड), आणि प्रशांत हनुमंत साठे (वय १९, रा. पाटस, ता. दौंड) अशी झाली असून, सध्या ते फरार आहेत.या घटनेने परिसरात प्रेमविवाह, जातीवादी मनोवृत्ती आणि गुन्हेगारी टोळ्यांच्या वर्चस्वाची भीती निर्माण केली आहे. कायद्याची भीती न बाळगता भरदिवसा दुकानात घुसून हल्ला केल्यामुळे पोलीस आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.न्यायसंस्थेवर विश्वास टिकवण्यासाठी आणि समाजात कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी या प्रकरणात कठोर कारवाई होणं अत्यावश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. समाजात वाढत चाललेली असहिष्णुता आणि बिनधास्त गुन्हेगारी मानसिकता यावर लगाम घालणं हे आता वेळेचं कठोर आव्हान बनलं आहे.

# खोटे सोने तारण ठेवून १२ लाखांची फसवणूक

## बँकेच्या पॅनलवरील सोनारासह तिघांविरोधात गुन्हा

**वैजापूर । प्रतिनिधी**

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वैजापूर येथील मोढा मार्केट शाखेत खोटे सोने तारण ठेवून कर्ज घेण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात बँकेला १२ लाख १५ हजार रुपयांचा आर्थिक फटका बसला असून, संबंधित दोन ग्राहक आणि बँकेच्या पॅनलवरील सोनाराविरोधात वैजापूर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शाखा व्यवस्थापक नवनीत नारायण शर्मा (वय ४७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जानेवारी २०२५ ते मे २०२५ दरम्यान गोकुळ सुखदेव सोनवणे, अनुराधा रणखांबे, पवन शिंदे आणि सरला उचित या चार ग्राहकांनी एकूण ३९८.७० ग्रॅम सोने तारण ठेवून २० लाख १५ हजार रुपयांचे कर्ज घेतले. यातील काही ग्राहकांनी कर्जाची परतफेड केली असली, तरी अन्य तिघांनी परतफेड न करता बँकेची फसवणूक केल्याचे उघड झाले. गोल्ड लोन प्रक्रियेनुसार, ग्राहकांकडून आलेले सोने बँकेच्या पॅनलवरील सोनार कमलेश आनंतराव अधिकार यांनी तपासले व ते खरे असल्याचे प्रमाणपत्र दिले. त्यांच्या याच खात्यावर विश्वास ठेवून कर्ज मंजूर करण्यात आले. मात्र, मे २०२५ मध्ये उपव्यवस्थापक दिपांजली जेधे यांनी कमलेश यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे संशयाच्या आधारावर प्रादेशिक कार्यालयाकडून नवीन सोनार सुमित भागवत यांच्याकडून पुन्हा तपासणी घेण्यात आली. ५ जून २०२५ रोजी करण्यात आलेल्या तपासणीत, वरील चारही प्रकरणांत तारण ठेवलेले सोनं बनावट असल्याचे स्पष्ट झाले. याबाबत सुमित भागवत यांनी लेखी अहवाल बँकेला सादर केला. बँकेच्या कारवाईनंतर गोकुळ सोनवणे आणि पवन शिंदे यांनी अनुक्रमे ५ लाख आणि ४ लाख रुपयांची रक्कम परत केली. मात्र अनुराधा रणखांबे (२.९० लाख) आणि सरला उचित (९.२५ लाख) यांनी कर्जाची रक्कम अद्याप परत केलेली नाही.शाखा व्यवस्थापक नवनीत शर्मा यांच्या तक्रारीवरून अनुराधा रणखांबे, सरला उचित आणि कमलेश अधिकार या तिघांविरुद्ध फसवणूक, विश्वासघात व बनावट प्रमाणपत्र सादर केल्याचा गुन्हा वैजापूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

# १३ हजार सूचनांच्या आधारे राज्याचे जनसुरक्षा विधेयक तयार; पावसाळी अधिवेशनात मांडणार

## नक्षल विचारसरणीला पायबंद घालणारे हे विधेयक निर्णायक ठरेल–बावनकुळे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राष्ट्रविघातक, डाव्या कडव्या विचारसरणीमुळे राज्यातील तरुणाई नक्षलवादाच्या दिशेने वळण्याचा संभाव्य धोका लक्षात घेता, या प्रवृत्तींवर कठोर प्रतिबंध घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने तयार केलेले विशेष जनसुरक्षा विधेयक लवकरच पावसाळी अधिवेशनात सादर होणार आहे. या विधेयकाच्या अंतिम स्वरूपावर आज विधानभवनात झालेल्या समितीच्या पाचव्या बैठकीत एकमताने निर्णय घेण्यात आला. या बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधताना समितीचे अध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे विधेयक राज्याच्या सुरक्षेसाठी महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

बावनकुळे यांनी सांगितले की, विधेयक तयार करताना राज्यातील नागरिकांकडून मिळालेल्या तब्बल १३ हजार सूचना, शिफारसी आणि सुधारणांचा सखोल अभ्यास करण्यात आला. त्या अनुषंगाने विधेयकात आवश्यक ते बदल करून अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. समाजाच्या सकारात्मकतेसाठी आणि तरुणाईला नक्षल विचारांपासून दूर ठेवण्यासाठी हे विधेयक आश्वासक ठरेल. समितीतील सर्व सदस्यांचे सहकार्य लाभल्यामुळे हे काम परिणामकारकपणे पार पाडता आले असल्याचे त्यांनी नमूद केले.विधेयकामध्ये नव्याने काही महत्त्वाच्या सुधारणा करण्यात आल्या आहेत.



डाव्या कडव्या विचारसरणीच्या संघटनांच्या बेकायदेशीर कृतींवर प्रभावी प्रतिबंध घालण्यासाठी कायद्याच्या उद्दिष्टात स्पष्टता आणण्यात आली आहे. याशिवाय सल्लागार मंडळाच्या रचनेत बदल करत उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश यांना समितीचे अध्यक्ष करण्यात येणार असून, सरकारी वकील सदस्य असतील. कायद्यांतर्गत गुन्ह्यांच्या तपासाची जबाबदारी पोलीस उपनिरीक्षकांऐवजी पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात येणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.या बैठकीदरम्यान आमदार जितेंद्र आव्हाड यांनी कायद्याचा अतिरेक होणार नाही आणि त्याचा दुरुपयोग टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जावी, अशी सूचना मांडली.समाजात नक्षलवादी विचारांकडे आकृष्ट होणाऱ्या विशिष्ट प्रवृत्तींचा कल लक्षात घेता, अशा तरुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने सर्वंकष परावृत्त धोरण तयार करावे, अशी शिफारस समितीने केली आहे. अशा धोरणांमुळे तरुणांना योग्य दिशा मिळेल आणि सामाजिक सलोखा अधिक बळकट होईल, असेही समितीचे म्हणणे आहे.राज्याच्या सामाजिक सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणारे हे विधेयक आता पावसाळी अधिवेशनात विधानसभेच्या मंजुरीसाठी सादर होणार असून, सर्वच राजकीय पक्ष या विधेयकाला पाठिंबा देतील आणि एकात्मतेसाठी आवश्यक ते पाऊल उचलतील, असा विश्वास महसूलमंत्री बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला.

# उपजिल्हा रुग्णालय डायलेसिस सेंटर उद्घाटनाच्या पत्रिकेतून आमदार-खासदारांची नावे वगळली

## शिवसेना तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे यांचा अधिकाऱ्यांना जाब

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रोहा उपजिल्हा रुग्णालयातील डायलेसिस सेंटरचे उद्घाटन शनिवार, ५ जुलै रोजी पार पडले. मात्र उद्घाटन कार्यक्रमाच्या पत्रिकेत स्थानिक आमदार आणि खासदारांची नावे वगळण्यात आल्याने वाद निर्माण झाला. याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) रोहा तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच खडेबोल सुनावले आणि पत्रिका तातडीने बदलण्यास भाग पाडले.शिंदे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील आणि रोहा उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन गोमसाळे यांना या प्रकाराबद्दल जाब विचारला. त्यांनी म्हटले की, रोहा तालुक्यातील शासकीय कार्यक्रमांमध्ये अनेकदा केवळ काही निवडक पदाधिकाऱ्यांची नावे दिली जातात. हे चुकीचे असून प्रोटोकॉलनुसार संबंधित लोकप्रतिनिधींच्या नावांचा समावेश असणे आवश्यक आहे.

रोहा तालुका तीन विधानसभा मतदारसंघांत विभागलेला आहे. त्यामुळे प्रोटोकॉलनुसार या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत राज्याचे आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर, मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, खासदार धैर्यशील पाटील, आमदार महेंद्र दळवी, ना. भरत गोगावले व रविंद्र पाटील यांची नावे असणे अत्यावश्यक होते, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले.त्यांनी पुढे सांगितले की,ज्या आरोग्यमंत्र्यांच्या निधीतून हे डायलेसिस सेंटर उभारण्यात आले, त्यांचेच नाव पत्रिकेत नव्हते. याकडे लक्ष वेधल्यावर केवळ एका तासात नवीन पत्रिका तयार करण्यात आली. मात्र, ती सर्व शासकीय स्तरांवर पोहोचवण्यात आलेली नाही, हे अत्यंत खेदजनक आहे.डायलेसिस सेंटरसारखी अत्यावश्यक सेवा गरजू व गरिबांसाठी उभारली जात असल्याने त्याचा अभिमान असल्याचे शिंदे यांनी नमूद केले. मात्र अशा सेवांमध्येही राजकारण केलं जातं हे दुर्दैवी आहे. या प्रकारातून संबंधितांनी शिकणे गरजेचे आहे. यापुढे जर अशा कार्यक्रमांत राजकारण करण्यात आले, तर शिवसेना आपल्या शैलीत उत्तर देईल, असा स्पष्ट इशारा तालुकाप्रमुख मनोजकुमार शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिला.



# गटशिक्षणाधिकारी ज्ञानेश्वर चहारे यांचा शिक्षण अधिकारी प्राथमिक यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

पंचायत समिती वरोरा येथील गटशिक्षणाधिकारी पदावरून सेवानिवृत्त झालेले ज्ञानेश्वर विठ्ठलराव चहारे यांचा सपत्नीक सन्मान समारंभ जिल्हा परिषद, चंद्रपूर येथे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) अश्विनी सोनवणे (केळकर) यांच्या हस्ते संपन्न झाला.




दि. ३० जून २०२५ रोजी ३९ वर्षे, ५ महिने आणि ७ दिवसांची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून नियत वयोमानानुसार चहारे यांनी आपल्या जबाबदारीतून निवृत्ती घेतली. त्यांनी आपल्या सेवाकाळात शेवटच्या दिवसापर्यंत प्रामाणिकपणे, तळमळीने आणि निष्ठेने काम केले. शनिवार-रविवारचा सुट्टीचा दिवस असो की अन्य कोणतीही अडचण कार्यालयीन कामात कुठलीही कसूर न करता त्यांनी आपले कार्यप्रेम सतत जपले.सहकारी कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षण क्षेत्रातील सर्व संबंधितांशी त्यांनी सौहार्दपूर्ण आणि आपुलकीचे संबंध प्रस्थापित केले. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे कार्यालयात सकारात्मक वातावरण होते. एक अत्यंत कार्यक्षम, शिस्तबद्ध आणि समर्पित अधिकारी म्हणून त्यांनी आपली वेगळी छाप सोडली आहे. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे पंचायत समिती वरोराला एक कर्तव्यनिष्ठ अधिकारी गमवावा लागत आहे. या प्रसंगी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी व शिक्षक वर्गाने त्यांना पुढील आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कार्याचा गौरव केला.

# शंकरपूर ग्रामपंचायतीच्या वतीने वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम

**चिमूर । प्रतिनिधी**

शंकरपूर येथील ग्रामपंचायतीच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या हरित अभियानांतर्गत गावात वृक्षदिंडी काढण्यात आली आणि वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला.या वृक्षदिंडीत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थी, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, ग्रामपंचायत सदस्य यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. संपूर्ण गावात फेरी काढण्यात आली असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.




फेरीची सांगता स्मशानभूमीत झाली. यानंतर त्या ठिकाणी सुमारे शंभर झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये कडुलिंब, आवळा, गुलमोहर, सीताफळ आदी प्रकारच्या झाडांचा समावेश होता.या वृक्षदिंडीला ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सविता चौधरी यांनी हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ केला. कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन ग्रामसेवक केशव गजबे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संपूर्ण ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी वर्गाने मेहनत घेतली. गावकऱ्यांच्या सहभागामुळे हा उपक्रम अधिक प्रभावी आणि प्रेरणादायी ठरला.

# एक पेड मां के नाम संकल्पनेतून वरोरा वनपरिक्षेत्रात वृक्षारोपणाचा उपक्रम




**वरोरा । प्रतिनिधी**

वनचेतना केंद्र टेमुर्डा अंतर्गत एक पेड मां के नाम या भावनिक आणि पर्यावरणपूरक संकल्पनेच्या माध्यमातून वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राचे आमदार करण देवतळे यांच्या हस्ते त्यांच्या मातोश्रींच्या नावाचा फलक रोवून वृक्षारोपणाचा प्रारंभ करण्यात आला.या उपक्रमात औषधी व फळझाडांमध्ये कदम, बेहडा, हिरडा, बेल, तसेच मौसंबी, संत्रा, बदाम, डाळिंब, पेरू, फणस, जांभुळ यांसारख्या प्रजातींची लागवड करण्यात आली. टेमुर्डा गावातील सरपंच, पोलिस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे सदस्य आणि इतर मान्यवरांनीही आपल्या आईच्या नावाने वृक्षलागवड करून सहभाग नोंदविला.प्रत्येक वृक्षाजवळ संबंधित आईच्या नावाचा फलक लावण्यात आला, हे या उपक्रमाचे खास वैशिष्ट्य ठरले. वनपरिक्षेत्र अधिकारी सतीश शेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चांभारे (क्षेत्र सहाय्यक, टेमुर्डा), लोणकर (शेगाव), ढुमने (वनपाल), तिखट, करकाडे, वेदांती, तसेच वन कर्मचारी, वनमजूर आणि झठढ सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

# युवा उद्योजक इंजि.निलेश गायकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

**अहिल्यानगर । सुयश नरसाळे**

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे माजी जिल्हा उपाध्यक्ष, युवा सामाजिक कार्यकर्ते, साई एंटरप्रायझेस उद्योग समूहाचे तसेच अगस्ती पतसंस्थेचे संचालक इंजि. निलेश ज्ञानदेव गायकर यांनी आपला वाढदिवस दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला.एक हात मदतीचा या संकल्पनेनुसार, अकोले तालुक्यातील आदिवासी व दुर्गम भागातील कुमशेत, बोरीचीवाडी, उंबरवाडी आणि लव्हाळवाडी येथील जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, दैनंदिन जीवनातील उपयोगी वस्तू व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या वेळी जिल्हा परिषद



संस्थेच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना इंजि. निलेश गायकर म्हणाले,मी माझा वाढदिवस दरवर्षी सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करतो. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, कार्यसम्राट आमदार किरण लहामटे आणि आमचे प्रेरणास्थान अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष मा. सीताराम पाटील गायकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम मी २०११ पासून सातत्याने राबवत आहे. आदिवासी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत व्हावी आणि वाढदिवसाचा खर्च समाजोपयोगी कार्यासाठी वापरावा, हा यामागचा उद्देश आहे.इंजि. निलेश गायकर हे त्यांचा वाढदिवस दरवर्षी सामाजिक बांधिलकी जपत शैक्षणिक, सामाजिक आणि सेवा उपक्रमांद्वारे साजरा करतात. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून गरजू विद्यार्थी, वृद्ध व वंचितांसाठी अनेक उपक्रम हाती घेतले असून, त्यांच्या कार्याचे नेहमीच सर्व स्तरातून कौतुक होत आले आहे.या वेळी भांगरे, आरोटे , अनुजशेठ देशमुख, वाकचौरे , गिऱ्हे , मुन्ना शेख, संदीप शेळके, अभिजित खर्डे, सुयश शेळके, चिंतामण अस्वले, बारकु अस्वले, संदीप अस्वले, योगेश काळे, आशिष राऊत यांच्यासह विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# नाळे वस्ती शाळेत साक्षरतेसाठी चिमुकल्यांची साक्षरता दिंडी विठ्ठलनामाचा गजर, पालकांचा उत्स्फूर्त सहभाग

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील नाळे वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत साक्षरतेबाबत जनजागृती करण्यासाठी एक आगळीवेगळी आणि आकर्षक साक्षरता दिंडी काढण्यात आली. या दिंडीत शाळेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेत, नामस्मरणाचा गजर करत गावातून फेरी काढली.



या वेळी सर्व विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेश परिधान केला होता. दिंडी दरम्यान गावातील प्रत्येक घरासमोर विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची पूजा केली. ग्रामस्थांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांना खाऊ देऊन त्यांचे कौतुक केले.या विशेष उपक्रमात पालक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाला मुख्याध्यापक संतोष पोतदार, शिक्षिका अनुराधा शिंदे, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस उपस्थित होते.साक्षरतेचा संदेश पोहोचवण्याच्या उद्देशाने शाळेने राबवलेल्या या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणारा आणि संस्कारपर असा हा उपक्रम सर्वच स्तरातून कौतुकास पात्र ठरला आहे.

# बालगोपालांच्या दिंडी सोहळ्याने झरे गावात भक्तिभावाचा वर्षाव

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलमध्ये पारंपरिक भक्तिभावाने भरलेल्या बालगोपाल दिंडी सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. विठ्ठल-रुक्मिणीच्या पूजा-आरतीने सुरुवात झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध लोककला, भक्तिगीते, फुगडी, रिंगण, मानोऱ्याचे सादरीकरण करत प्रेक्षकांचे मन जिंकले.विठ्ठल-रुक्मिणीच्या भूमिकेत विद्यार्थ्यांचा अभिनय विशेष लक्षवेधी ठरला. त्यांच्या सहज सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षक भावविभोर झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन



राधेश्याम मंगल कार्यालयाचे बाळासाहेब जाधव, संस्थापक प्राचार्य जयप्रकाश बिले, युवराज बिले, आशा बिले, स्वाती बिले आणि मुख्याध्यापिका अमृता परदेशी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमासाठी पालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.

टाळ, मृदंग, हलगीच्या गजरात विठ्ठलनामाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारलेला दिसला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संचालिका स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी तसेच सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. त्यांच्या परिश्रमांना उपस्थितांनी मनःपूर्वक दाद दिली.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा, परंपरेशी नाळ जुळवणारा आणि भक्तिभाव जागवणारा ठरला.

# गतिमान प्रशासनाचे सकारात्मक पाऊल, महाराजस्व समाधान शिबिर यशस्वीपणे पार पडले; ना.तटकरे यांच्याकडून प्रशासनाचे अभिनंदन

**रोहा । प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत रोहा येथे आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांच्या योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी देण्यात आला. माजी मंत्री ना. अदिती तटकरे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या भव्य शिबिरात प्रशासनाच्या कार्यपद्धतीचे आणि सेवाभावी वृत्तीचे तिने मुक्तकंठाने कौतुक केले.या शिबिरात जिल्हाधिकारी किशन जावळे, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, मुख्याधिकारी नेहा भोसले यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. शिबिरात लावण्यात आलेल्या स्टॉलमध्ये प्रत्येक विभागाने आपल्या योजना व सेवा नागरिकांसमोर मांडल्या. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्व स्टॉलना भेट देत अधिकाऱ्यांशी संवाद साधला, बचत गटांशी संवाद साधत त्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

ना. अदिती तटकरे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शासनाच्या विविध योजनांचा लाभ एका छताखाली देण्याचा हा उपक्रम म्हणजे प्रशासनाच्या गतिशीलतेचे आणि लोकाभिमुखतेचे प्रतीक आहे. शिबिरातून नागरिकांची कामे सुलभ झाली असून, दाखले, योजना, आणि विविध प्रमाणपत्रे सहजतेने उपलब्ध झाली आहेत. त्यांनी पुढे म्हटले की, अशा उपक्रमांची माहिती येत्या १५ ऑगस्टच्या ग्रामसभेत प्रत्येक ग्रामपंचायतीने नागरिकांपर्यंत पोहोचवावी. प्रशासन अधिक वेगाने, परिणामकारकरीत्या काम करावे, कोणत्याही प्रकारचा विलंब टाळावा, तसेच



भूमी अभिलेख खात्याने सुधारणा करून नागरिकांच्या अडचणी दूर कराव्यात, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.या शिबिरात शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. लाभार्थी शेतकऱ्यांना कृषी अवजारे, बियाणे, सेंद्रिय शेती योजनेची मंजुरीपत्रे प्रदान करण्यात आली. आरोग्य विभागाच्या योजना, सूर्यघर योजना, मतदान नोंदणी, प्रधानमंत्री आवास, आयुष्यमान भारत योजना, आणि विविध दाखले यांचा लाभही या शिबिरात देण्यात आला. महिला बचत गटांना ई-रिक्षा आणि इतर साहित्याचे प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.या कार्यक्रमात टीबी मुक्त अभियानांतर्गत महाळुंगे, चिंचवली तर्फे दिवाळी, चणेरा, निडी तर्फे अष्टमी या ग्रामपंचायतींचा गौरव ना. अदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी तहसील कार्यालय, कृषी विभाग, आरोग्य विभाग, वीज वितरण, भूमी अभिलेख, पंचायत समिती यांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. या शिबिराला तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावून शासकीय योजनांचा लाभ घेतला.हा उपक्रम केवळ योजनांचा लाभ देणारा नव्हे, तर प्रशासन आणि जनतेमधील संवाद व विश्वास वाढवणारा ठरला आहे. अशा शिबिरांमुळे प्रशासनाचा खऱ्या अर्थाने लोकसंपर्क व लोकसेवा हा उद्देश साकार होत असल्याचे प्रतिपादन उपस्थित मान्यवरांनी केले.

## हिराबाई शाळेत विद्यार्थ्यांच्या संतमेळ्यात 'पंढरी' अवतरली

# आषाढी एकादशीनिमित्त वारी, वृक्ष दिंडी व भजनाचा भक्तिमय उत्सव

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

आषाढी एकादशीनिमित्त हिराबाई गोयनका कन्या विद्यालयात विद्यार्थिनींच्या पारंपरिक वेशभूषेतील संतमेळ्याने 'पंढरी'चे प्रत्यक्ष दर्शन घडविले. टाळ- मृदुंगाच्या गजरात व विठ्ठल नामस्मरणात नटलेली वारी संपूर्ण शहरात भक्तिभावाने दुमदुमली. या दिंडीचे वैशिष्ट्य म्हणजे एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत वृक्षदिंडीसुद्धा राबविण्यात आली.धामणगाव एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती हिराबाई गोयनका कन्या विद्यालयात शनिवारी, ५ जुलै रोजी सकाळी ९ वाजता आषाढी वारीचे आयोजन करण्यात आले. वर्ग पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थिनींचा सहभाग लाभलेल्या या भक्तिमय वारीमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

शाळा समितीच्या अध्यक्षा शोभादेवी राठी, मुख्याध्यापिका देशपांडे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या पालखीचे विधिवत पूजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी टाळ, लेझीम, पताका, रिंगण घेऊन वेशभूषेसह सहभागी होत संपूर्ण दिंडी फुलवली.विठ्ठलाच्या वेशभूषेत तुळशी हरीश पुरोहित (प्राथमिक), प्रयोगी गोडबोले (१०वी, नंदिनी), लक्ष्मी धांदे (८वी, अलकनंदा) तर रुक्मिणीच्या वेशात स्वरा काळमेघ (५वी, पांझरा), विधी चौधरी (१०वी, नंदिनी), भूमिका साळवीकर (१०वी, पयोष्णी) या विद्यार्थिनी सहभागी झाल्या.वारीची सुरुवात शास्त्री चौकातील गजानन महाराज मंदिरातील पूजनाने झाली. त्यानंतर दिंडी धवणेवाडी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पोहोचली. पूजन, रिंगण, टाळ-लेझीमच्या तालासह दिंडी शाळेच्या आवारात परत आली. या वारीत वृक्षदिंडीचा विशेष समावेश होता. मुख्याध्यापिका देशपांडे, उपमुख्याध्यापक राठोड व इको क्लब प्रमुख वडगिरे यांच्या हस्ते नागरिकांना वृक्षांचे रोप भेट देण्यात आले.शाळेत परतल्यानंतर विद्यार्थिनींनी समूह भजन गायन सादर केले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका देशपांडे, उपमुख्याध्यापक राठोड, पर्यवेक्षिका टेंभुर्णे तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली. विठ्ठल नामाचा जयघोष करत चिमुरड्या वारकऱ्यांच्या पावलांनी पंढरीची अनुभूतीच निर्माण झाली होती,असे उपस्थितांनी नमूद केले.



# दर्जेदार प्रशिक्षकच घडवतील सकस स्काऊट-गाईड चळवळ-मोहन गुजरकर

## वर्धा जिल्हास्तरीय प्रशिक्षकांच्या बैठकीत उपक्रमांचे नियोजन; प्रशिक्षकांचा गौरव

**वर्धा । प्रतिनिधी**

नवीन शिक्षणपद्धतीनुसार कृतिशील शिक्षणाला प्राधान्य देण्यात आले असून, स्काऊट-गाईड चळवळीचा अभ्यासक्रम या दिशेने मार्गदर्शक आहे. या अभ्यासक्रमाचा लाभ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकाधिक शिक्षकांना या चळवळीत सहभागी करून त्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे. दर्जेदार प्रशिक्षकच सकस स्काऊट-गाईड चळवळ निर्माण करू शकतात,असे प्रतिपादन रोव्हर स्काऊट जिल्हा आयुक्त व सहाय्यक लीडर ट्रेनर कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले.



भारत स्काऊट गाईड वर्धा जिल्हा कार्यालयाच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय स्काऊट-गाईड प्रशिक्षकांची बैठक ३ जुलै रोजी स्थानिक प्रशिक्षण केंद्रात संपन्न झाली. या बैठकीत वर्षभरात राबवायच्या विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन मोहन गुजरकर होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किरण जंगले, स्काऊट जिल्हा संघटन आयुक्त नितेश झाडे, गाईड संघटन आयुक्त वैशाली घोम आणि माजी जिल्हा संघटक प्रकाश डाखोळे यांची उपस्थिती होती. यावेळी सहाय्यक जिल्हा आयुक्त राजहंस जंगले, अभिजीत पारगावकर, निर्मला नंदुरकर, रूपा कडू, सुनील खासरे, अयुब शेख, सुयोग ठाकरे, प्रियंका ठोसर आणि राजेश जयस्वाल यांचीही उपस्थिती होती.

जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किरण जंगले यांनी वर्षभरात उपक्रमशीलतेला चालना देण्याचा आग्रह धरला. तर नितेश झाडे यांनी स्काऊट गाईड अभ्यासक्रमावर आधारित विविध प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला. या बैठकीत स्काऊट युनिट लीडरचे सर्वोच्च प्रशिक्षण - हिमालया वूड बॅच प्राप्त करणाऱ्या राजहंस जंगले आणि अभिजीत पारगावकर यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच नव्यानेच गाईडच्या जिल्हा संघटक पदावर रुजू झालेल्या वैशाली घोम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.


बैठकीचे संचालन नितेश झाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन वैशाली घोम यांनी मानले.

# शेतकऱ्यांच्या मागण्या पावसाळी अधिवेशनात मांडणार-आ.अडसड

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

धामणगाव रेल्वे येथील आमदार प्रतापदादा अडसड यांनी पावसाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या मागण्या मांडण्याचा निर्धार केला आहे. डिमांड भरलेल्या शेतकऱ्यांना तत्काळ पंप उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी अधिवेशनात केली असून, शेतकऱ्यांच्या हितासाठी सरकारकडून अधिक ठोस निर्णय घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.देशात व राज्यात काँग्रेसची सत्ता असताना शेतकऱ्यांसाठी योग्य योजना राबवण्यात आल्या नाहीत. त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडले. मात्र, महायुती सरकार आणि मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी सकारात्मक निर्णय घेतले गेले. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो, असे प्रतिपादन आमदार अडसड यांनी केले.

तसेच, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय काँग्रेसने जाहीर केला होता, परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी केली नाही, असा आरोप त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने हा निर्णय प्रत्यक्षात आणला असून, आज शेतकऱ्यांना मोफत वीज मिळत आहे. याशिवाय, शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा संकल्प देखील त्यांनी केला आहे, असेही ते म्हणाले. आमदार अडसड यांनी सांगितले



की, त्यांच्या मतदारसंघात दोन फीडर सोलरवर कार्यरत झाले असून, जवळपास २,५०० शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळू लागली आहे. यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार असून, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास देखील हातभार लागणार आहे. शेतकऱ्यांसाठी अशा योजनांची प्रभावी अंमलबजावणी झाली तर शेती समृद्ध होईल, असा विश्वास आमदार अडसड यांनी व्यक्त केला आहे.

# ब्रिलियंट स्कूल हिंगणघाट येथे एक पेड माँ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षदिंडी व वृक्षारोपण

## शाळा परिसरात लावण्यात आले ६१ वृक्ष; विद्यार्थ्यांचा वृक्षसंवर्धनाचा संकल्प

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट संचालित ब्रिलियंट स्कूल येथे एक पेड माँ के नाम या संकल्पनेअंतर्गत वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाअंतर्गत शाळा व परिसरात एकूण ६१ वृक्षांचे रोपण करण्यात आले.या वेळी विद्या विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर आणि सचिव डॉ. नयना तुळसकर यांची विशेष उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी वृक्षांची सजवलेली पालखी मिरवली व विविध घोषवाक्यांच्या माध्यमातून वृक्षांचे महत्त्व सांगत परिसरात जनजागृती केली.

शाळा परिसर व परिसरातील मोकळ्या जागांमध्ये कडुलिंब, चाफा, कदम, कोणोकार्पस, गुलमोहर, वड इत्यादी ६१ वृक्षांचे रोपण करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांसह पालकांनीही सहभाग नोंदवला. एक पेड माँ के नाम या भावनिक संकल्पनेने वृक्षारोपणाला विशेष रंगत आली.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. नयना तुळसकर यांनी वृक्षांचे मानवी जीवनातील व निसर्गचक्रातील महत्त्व स्पष्ट केले, तर अध्यक्षीय मनोगतात डॉ. उमेश तुळसकर यांनी वृक्षसंवर्धन करताना घ्यावयाची काळजी सांगितली.उपक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक अभय दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता .समारोपाप्रसंगी विद्यार्थ्यांनी वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प केला.



# प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

## शेतकरी बांधवांना वेळेत विमा काढण्याचे आवाहन

**धामणगाव रेल्वे । प्रतिनिधी**

खरिप हंगाम २०२५-२६ साठी प्रधानमंत्री पीक विमा योजना पुन्हा एकदा शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आली असून, यामध्ये सहभागी होण्यासाठी अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देणे आणि त्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण करणे हा आहे.


जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी या योजनेसाठी भारतीय कृषी विमा कंपनीची निवड करण्यात आली आहे. जिल्हा कृषी विभागामार्फत योजनेच्या अंमलबजावणीस प्रारंभ करण्यात आला असून, शेतकऱ्यांनी या योजनेत वेळेत सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. योजना केवळ पिक विमा संरक्षण पुरवते इतकेच नव्हे तर आधुनिक तंत्रज्ञान व सुधारित कृषी उपकरणे वापरण्यास शेतकऱ्यांना प्रेरित करते. कृषी क्षेत्रात सातत्य राखणे, उत्पन्नाचा विविधीकरण घडवून आणणे आणि स्पर्धात्मकतेत भर घालणे यासाठी ही योजना उपयुक्त ठरणार आहे.या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपली ॲग्रीस्टॅक ओळख क्रमांकासह ७/१२ उतारा, ८अ नमुना, आधार कार्ड, बँक पासबुक आणि स्वयंघोषणापत्र यांसह संबंधित दस्तऐवज सादर करून अर्ज करावा लागेल. योजनेअंतर्गत पीक विमा भरताना शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी प्रणालीद्वारे पिकांची नोंदणी करणेही बंधनकारक करण्यात आले आहे. कोणताही अर्ज दुसऱ्या व्यक्तीच्या नावाने अथवा बनावट मार्गाने सादर केल्यास तो रद्द करण्यात येणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

प्रत्येक पिकासाठी संरक्षित विमा रक्कम आणि प्रती हेक्टर विमा हप्ता निश्चित करण्यात आला असून, तांदळासाठी ६१ हजार रक्कम असून हप्ता १५२.५० रुपये, ज्वारीसाठी ३२ हजार ९०० रक्कम व ८२.३५ रुपये हप्ता, सोयाबीनसाठी ५५ हजार ९०० रक्कम व ५५९ रुपये हप्ता, मूगसाठी २६ हजार ६०० रक्कम व ५३२ रुपये हप्ता, उडदासाठी २५ हजार रक्कम व ६२.५० रुपये हप्ता, तुरसाठी ४५ हजार ७०० रक्कम व ४५७ रुपये हप्ता, कापसासाठी ६० हजार रक्कम व ७५० रुपये हप्ता, तर मक्यासाठी ३६ हजार रक्कम व ९० रुपये हप्ता निश्चित करण्यात आला आहे. या योजनेसाठी अर्ज करताना सीएससी केंद्रामार्फत शेतकऱ्यांकडून अधिक शुल्क आकारले गेल्यास, त्यांनी त्वरित कृषी विभाग, तहसील कार्यालय अथवा जिल्हा कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून तक्रार दाखल करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शासनाच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना भविष्यातील संभाव्य संकटांचा सामना करण्यासाठी आधारभूत सुरक्षा उपलब्ध होणार असून, जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ३१ जुलैपूर्वी विमा नोंदणी पूर्ण करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# रामलला हनुमान मंदिरात मध्यरात्री चोरी

## सीसीटीव्ही तोडून दानपेटीतील रोकड लंपास

### १५ हजारांचे नुकसान; पुलगाव पोलिसांकडून तपास सुरू



**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव-नाचणगाव मार्गावरील सार्वजनिक रामलला हनुमान मंदिरात ४ जुलै रोजी रात्री १ ते २ दरम्यान चोरीची घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे वायर तोडून, दानपेटी फोडून रोकड लंपास केली.पुलगाव ते नाचणगाव दरम्यान कालव्याजवळ असलेल्या या मंदिरात चोरटे रात्रीच्या अंधारात घुसले. त्यांनी प्रथम सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे वायर तोडून निष्क्रिय केले व त्यानंतर मंदिरातील दानपेटी फोडली. या फोडलेल्या दानपेटीतील रक्कम आणि कॅमेरे मिळून सुमारे १५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे मंदिर समितीचे सचिव उत्तम ढाकुलकर यांनी सांगितले.या घटनेबाबत पुलगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

# धामणगावात रस्त्याच्या दुरवस्थेबाबत शिवसेनेचे निवेदन



**धामणगाव रेल्वे । प्रशांत मून**

शास्त्री चौक ते भंडारी बगीचा दरम्यानचा रस्ता दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यंत महत्वाचा असून शाळा, महाविद्यालये आणि नवीन वसाहतीमुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट असून जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत असून, एखाद्या मोठ्या दुर्घटनेनंतरच प्रशासन जागं होणार का? असा सवाल उपस्थित करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) धामणगाव शहर व तालुका यांच्या वतीने नगर परिषदेला निवेदन देण्यात आले.

या रस्त्याचे भूमिपूजन विधानसभा निवडणुका पूर्वी तत्कालीन व विद्यमान आमदारांच्या हस्ते करण्यात आले होते. शहरातील रस्त्यांचे सिमेंटीकरण करण्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर झालेला असून केवळ कोठारी नगर ते गजानन महाराज मंदिर दरम्यानचे काही काम वगळता इतरत्र कोणत्याही कामाची प्रत्यक्ष सुरुवात झालेली नाही, ही वस्तुस्थिती शिवसेनेने निवेदनात अधोरेखित केली.येत्या १५ दिवसांत या रस्त्याचे काम सुरू झाले नाही, तर खड्ड्यांमध्ये बेशरमची झाडे लावून शिवसेना स्टाईलने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या सर्व परिस्थितीसाठी नगरपरिषद प्रशासन पूर्णतः जबाबदार राहील, असेही नमूद करण्यात आले आहे.हे निवेदन नगरपरिषद धामणगाव रेल्वेच्या मुख्याधिकारी यांना शिवसेना तालुकाप्रमुख नानाभाऊ देऊळकर यांच्या नेतृत्वात देण्यात आले. यावेळी माजी शहरप्रमुख गोपाल मोकुलकर, शहर संघटक अशोक कुचेरिया, उपतालुकाप्रमुख दीपक कुंमरे, उपशहर प्रमुख संतोष गावंडे, विभागप्रमुख रवी काटणकर, अतुल चौधरी, मनीष गोपाळ, स्वप्निल कोंबे, आशिष गावंडे, सागर गुल्हाने, संदीप गोटाणे, मधुर पालीवाल, प्रतीक ढोमणे आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# विजेचा शॉक लागून गाईचा दुर्दैवी मृत्यू; दोन बैल थोडक्यात बचावले

## सेलडोह येथील घटना; शेतकरी प्रशांत सोनटक्के यांचे आर्थिक नुकसान

**सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी**

सेलडोह परिसरात विजेच्या तुटलेल्या तारेमुळे एक दुर्दैवी घटना घडली आहे. आज सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास चाराईस गेलेल्या गाईचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाला. सुदैवाने सोबत असलेले दोन बैल थोडक्यात बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवार दिनांक ७ जुलै २०२५ रोजी शेतकरी प्रशांत सोनटक्के यांचा सालगडी लालसिंग केवट हा सिंदी-सेलडोह मार्गालगतच्या पडीत शेतात जनावरे चारत होता. याच दरम्यान तेथे वीज वितरण कंपनीचा प्रवाहित विद्युत तार तुटून जमिनीवर पडलेला होता. गाय चाराई करत असताना ती त्या तुटलेल्या तारेच्या संपर्कात आली आणि ती जागीच कोसळली. विजेचा तीव्र शॉक बसल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची जाणीव होताच सालगडीने तात्काळ बैलांना दूर नेले आणि आरडाओरड करत परिसरातील नागरिकांना मदतीसाठी बोलावले. परंतु तोपर्यंत गाईचा मृत्यू झाला होता. याची माहिती त्वरित





सिंदी पोलीस ठाणे, वीज वितरण कंपनीचे केळझर व सेलू येथील कार्यालयांना देण्यात आली आहे. गाईच्या मृत्यूमुळे शेतकरी प्रशांत सोनटक्के यांचे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांनी शासनाकडे योग्य नुकसान भरपाईची मागणी केली आहे. वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे हा प्रकार घडल्याचा आरोपही शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.स्थानिक प्रशासन आणि वीज वितरण विभागाने तातडीने चौकशी करून शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# आ.करण देवतळे : एक युगद्रष्टा नेतृत्व

## ख़ुदी को कर बुलंद इतना कि हर तक़दीर से पहले ख़ुदा बंदे से खुद पूछे, बता तेरी रज़ा क्या है

**या ओळी केवळ शायरी नसून, त्या एका नेता मनोवृत्तीचं प्रतिबिंब आहेत. आणि या आत्मविश्वासाच्या तेजात झळकणारं नाव म्हणजे आमदार करण संजयराव देवतळे. याच आत्मविश्वासाने लोकसेवेच्या मैदानात उतरलेले आमदार करण संजयराव देवतळे, केवळ नावाने नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवलेल्या कार्यक्षमता आणि समाजाविषयीच्या प्रामाणिक नात्यामुळे आज वरोराच्या मतदारसंघात आदर्श नेता म्हणून उभे आहेत. ते आज केवळ मतदारसंघाचे प्रतिनिधी नाहीत, तर हजारो जनतेच्या आशा–आकांक्षांचे अधिष्ठान बनले आहेत.वरोराच्या मातीत जेव्हा आपण स्व. संजय वामनराव देवतळे यांचं नाव घेतो, तेव्हा डोळ्यांसमोर एक स्पष्टवक्ते, समर्पित, निस्वार्थ आणि सत्तेचा लोभ नसलेला नेता उभा राहतो. त्यांच्या निधनानंतर वरोराच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली होती. ही पोकळी करण देवतळे यांच्या रुपाने भरून निघत आहे. त्यांनी केवळ वडिलांचा वारसा पुढे नेला नाही, तर स्वत:च्या स्वतंत्र नेतृत्वशैलीने एक विश्वासार्ह चेहरा तयार केला आहे.**

करण देवतळे हे केवळ भावनाशील नेता नाहीत, तर ते व्यवस्थापनशास्त्राचे प्रशिक्षण घेतलेले, तंत्रशुद्ध दृष्टिकोन असलेले एक सुसंवादित आणि दूरदृष्टीचे नेतृत्व आहेत. नागपूर विद्यापीठातून सिव्हिल इंजिनिअरिंग आणि त्यानंतर M.B.A. (Finance Marketing) ही शैक्षणिक शिदोरी त्यांनी विकासकामांमध्ये पारदर्शकता, योजना अंमलबजावणी, आणि प्रशासनाशी सुसंवाद यात प्रभावीपणे वापरली आहे. २०२१ पासून त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या युवक मोर्चातून कार्याला सुरुवात केली. त्यांनी आपल्या कामाची सुरुवात गाव पातळीवरून केली. सामान्य कार्यकर्त्यांप्रमाणेच. नेतृत्व टिकवण्यासाठी सत्तेची गरज नाही, लोकांच्या विश्वासाची गरज असते. हा विश्वास त्यांनी २०२४ साली मिळवला.वरोरा विधानसभा मतदारसंघात प्रचंड मतांनी विजयी होऊन. ही निवडणूक त्यांच्या जीवनातला निर्णायक क्षण ठरली, ज्यामध्ये त्यांनी पक्षाचा ध्वज खांद्यावर घेत जनतेच्या सेवा कार्याला वाहून घेतलं. आज आमदारकीच्या वर्षपूर्तीच्या दिशेने वाटचाल करत असताना, करण देवतळे यांनी अल्पावधीतच आपल्या कारभाराची ठसा उमटवलेला आहे. त्यांच्या आमदारकीच्या काळात वरोरा विधानसभा क्षेत्रात अनेक ठोस कामे झाली आहेत. या कामांमध्ये केवळ योजना नाहीत, तर त्यामागचं दूरदर्शन, भान, नियोजन आणि संपूर्ण पारदर्शकता दिसते. त्यांचं सर्वात मोठं बलस्थान म्हणजे जनतेशी थेट, सुसंवादशील नातं. कोणी शेतकरी हवालदिल असो, कुणी विधवा महिला अर्ज घेऊन आली असो, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागो करण देवतळे प्रत्येक गरजवंताच्या मदतीला तत्पर असतात. त्यांचं कार्यालय म्हणजे केवळ आमदार दालन नाही, तर जनसुनावणीचं पारदर्शक व्यासपीठ आहे. त्यांच्या कार्यालयात कोणताही पक्ष, जात, धर्म वा वर्ग भिंत ठरत नाही  तिथे माणूस आणि त्याची गरज हाच केंद्रबिंदू आहे. त्यांच्या नेतृत्वाचा एक ठळक पैलू म्हणजे त्यांची दैनंदिन उपस्थिती. कोणतीही सभा, कार्यक्रम, वा शासकीय बैठक असो करण देवतळे यांची उपस्थिती ही नुसती औपचारिक नसते, ती सक्रिय सहभागाची असते. ग्रामविकास योजनांपासून ते शेतकऱ्यांच्या विमा तक्रारींपर्यंत प्रत्येक मुद्यावर ते लक्ष ठेवून असतात. आज ते एक विश्वासार्ह यंत्रणा निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहेत. ते विधानसभेत आवाज चढवत नाहीत पण मुद्दा ठाम मांडतात. त्यांच्या भाषणात वस्तुनिष्ठ आकडेवारी, समस्येचा मूलगामी अभ्यास, प्रशासनाला मार्गदर्शन आणि जनतेसाठी स्पष्ट संदेश यांचं उत्तम मिश्रण असतं. ते भाषणात राजकीय विरोधकांवर टीका करताना ही गरिमेसह विचार मांडतात. ते मतभेदांना वैर नसून चर्चेचा एक भाग मानतात. त्यांच्या संयमित भाषाशैलीने विधानसभेतील अनेक नेत्यांचं लक्ष वेधलं आहे. ते फक्त आमदार नाहीत, तर भविष्यातील संभाव्य मंत्री, पक्षाचा धोरणात्मक चेहरा म्हणूनही पाहिले जात आहेत. त्यांच्या योजनांमध्ये वरोरा टेक्नॉलॉजी हब, कृषी स्टार्टअपसाठी इनक्युबेशन सेंटर, हरित उर्जेचा प्रसार, महिलांसाठी डिजिटल उद्यम केंद्र, आरोग्य व जलसंधारण क्षेत्रात खास निधी हे सगळं त्यांच्या दूरदृष्टीचं प्रतिबिंब आहे. त्यांनी स्थानिक तरुणांमध्ये नेतृत्व निर्माण करण्यासाठी सुद्धा अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या नेतृत्त्वामुळे वरोरातील युवकांमध्ये नवा आत्मविश्वास जागा झाला आहे. जनतेच्या आरोग्याच्या गरजा ओळखून करण देवतळे यांनी अनेक सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यांचा वाढदिवस केवळ औपचारिकता न ठरता, महा आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर हे समाजसेवेचं उदाहरण ठरत आहे. मंगळवार, ८ जुलै २०२५ रोजी आयोजित या शिबिरात विविध वैद्यकीय विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत सर्वसामान्य जनतेसाठी नि:शुल्क आरोग्य तपासणी, औषधवाटप, रक्तदान, शुगर/बीपी चाचण्या, नेत्र तपासणी, मोफत वाहन सुविधा व म्ब्युलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा उपक्रम म्हणजे त्यांच्या संवेदनशील नेतृत्वाची आणि सामाजिक बांधिलकीची जिवंत साक्ष आहे. स्व.संजय बाबूंच्या स्मृतीदिनी करण देवतळे यांनी एक सामाजिक उपक्रम म्हणून नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात शेकडो दृष्टिहीन नागरिकांची मोफत नेत्र तपासणी करून त्यांना आवश्यक त्या शस्त्रक्रिया करून पुन्हा नवदृष्टी देण्याचं कार्य त्यांनी केलं. हा उपक्रम केवळ वैद्यकीय मदतीपुरता मर्यादित नव्हता, तर तो त्यांच्या सामाजिक भानाची आणि वडिलांप्रती असलेल्या आदराची प्रचीती देणारा होता. त्याचप्रमाणे दिव्यांग नागरिकांसाठीही त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने कार्य केले आहे. अपंग बांधवांसाठी तीनचाकी सायकल वाटपाचा एक विशेष उपक्रम त्यांनी राबवला. या सायकलींमुळे अनेकांना स्वावलंबनाचा नवा आधार मिळाला आणि त्यांच्या दैनंदिन जीवनात सुलभता आली. हे फक्त साहित्य वाटप नव्हे, तर माणसाला आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न होता. करण देवतळे हे आज केवळ वरोराचे आमदार नाहीत. ते जनतेच्या मनातील विश्वासाचं प्रतीक आहेत. त्यांच्या विचारात स्पष्टता, कृतीत गती, भाषेत नम्रता आणि अंत:करणात सेवा भाव आहे. ते गावकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे, प्रत्येक छोट्या प्रश्नासाठी धावून येणारे आणि लोकांच्या हाकेला तत्काळ प्रतिसाद देणारे नेता आहेत. कर्मण्ये वाधिकारस्ते... या भगवद्गीतेच्या उक्तीप्रमाणे सेवा आणि कर्मशीलतेतच आपलं यश मानणाऱ्या आ. करण संजयराव देवतळे यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा! वरोराच्या विकासाच्या या युगप्रवासात त्यांचे नेतृत्व सदैव प्रगतीपथावर राहो, हीच प्रार्थना.



संपादक
आशिष घुमे
e sahyandrinews@gmail.com




















सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha  Rakhandar Daily Newspaper  Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .